# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/०८/१७
## दि.०९/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २७७/१७,भादविक ३९५,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६(२),३६४ ५११,आर्म ॲक्ट ३(२५) |
| **फिर्यादी** | राजेंद्र विटणकर,वय-६३,रा.वृंदावन अपार्ट.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | कैलास मारुतराव गायकवाड,रा.औंध,पुणे व त्याचे तीन ते चार साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/१७ रोजी १२/०० मा.स्मॉल कॉज न्यायालय इमारत व गेट नं.३,शिवाजीनगर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वकिल असुन त्यांनी यातील नमुद इसम कैलास गायकवाड याची कोर्टामध्ये दाव्या संदर्भात उलट तपासणी घेतल्याचा त्यास राग आल्याने त्याने कोर्टात साक्ष चालु असताना फिर्यादी यांना मी तुझ्याकडे बघुन घेतो,तु मला ओळखत नाही का बाहेर चल अशी तीन ते चार वेळा धमकी दिली. त्यानंतर सुनावणी संपल्यानंतर त्याने व त्याचे साथीदारांनी फिर्यादी यांची कॉलर व दंडाला पकडुन गेट क्रं.३ चे बाहेर ओढत नेवुन त्यांना धक्का-बुक्की करुन चष्मा तोडुन नुकसान केले. तसेच फिर्यादी यांना रिव्हॉल्वरचा धाक दाखवुन त्यांचेवर रोखुन जीवे मारण्याची धमकी देऊन,फिर्यादी यांचे खिशातील १५,०००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेऊन त्यांना जबरदस्तीने गाडीत कोंबुन पळवुन नेण्याचा प्रयत्न करीत असताना,फिर्यादी यांनी आरडाओरडा केल्याने तेथील वकिल व पक्षकार यांची जमलेली गर्दी पाहुन कैलास गायकवाड व त्याचे साथीदार हे फिर्यादी यांना सदर ठिकाणी सोडुन पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निंबाळकर ८६५२०९४४८८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २९०/१७,भादविक ४५७,३८०,३४ |
| **फिर्यादी** | अनिल परांजपे,वय-४० वर्ष,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | १.ओकांर बापु गायके,वय-१९ वर्ष,रा.शिंदे चाळ,शास्त्रीनगर कोथरुड,पुणे २.समीर सिंकदर राऊत,वय-२०,रा.सदर (अटक) व त्याचा एक साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०८/२०१७ रोजी पहाटे ०४/१५ वा.शुभंकर सोसायटी मधील शुभंकर महादेव मंदिरात भेलकेनगर,कोथरूड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांच्या नमुद सोसायटी मधील शुभंकर महादेव मंदिराची दानपेटी यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,मंदिराचे लोखंडी दरवाज्यास लावलेले कुलुप तोडुन त्यावाटे मंदिरात प्रवेश करुन,मंदिरातील दान पेटी फोडुन त्यामधील रोख १९ हजार रूपये रक्कम स्वतःचे फायदयासाठी चोरी करीत असताना,शुभंकर सोसायटी मधील वॉचमनने पकडुन पोलीसांचे ताब्यात दिले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.पांढरे ९८२३६६२४११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २९१/१७,भादविक ३२३,३८४,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.१४२ व ३७(१) १३५, आर्म ॲक्ट ४ (२५) |
| **फिर्यादी** | राकेश इंजापुरी,वय-३४,रा.५४,एच.पी.लोहियानगर,पुणे |
| **आरोपी** | १.मोमीन हसन शेख,वय-२०,रा.प्रायवेट रोड,ताडीवाला रोड,पुणे २.किरण धनराज खरात,वय-२३,रा.प्रायवेट रोड,ताडीवाला रोड,पुणे ३.सागर गौतम सोनकांबळे,वय-३२,रा.२२७,मंगळवार पेठ,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०८/१७ रोजी २१/१५ वा.शेरटॉन हॉटेलचे पाठीमागे राजा बहादुर मिल,ॲमेझॉन कंपनीचे डिलीव्हरी गोडावुन मध्ये बंडगार्डन,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे ॲमेझॉन कंपनी मध्ये असोसिएट या पदावर नोकरीस आहेत. फिर्यादी व त्यांचे इतर साथीदार असे राजा बहादुर मिल,ॲमेझॉन कंपनीचे डिलीव्हरी गोडावुन मध्ये बंडगार्डन,पुणे येथील कंपनीत दैनंदिन कामकाज करीत असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे ॲमेझॉन कंपनीचे गोडावुन मध्ये घुसुन त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,लोखंडी पालघन फिर्यादी व त्यांचे साथीदारांना व सिक्युरिटी गार्ड यांना दाखवुन त्यांना २ लाख रुपयेची खंडणी मागितली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस एम पवार ९७६७२२३५३९ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी पो स्टे २२४/१७,भादविक १७०,४२० |
| **फिर्यादी** | निलेश सोनार,वय-३६,रा.चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०५/१७ रोजी सकाळी १०/०० ते १०/३० वा.चे दरम्यान अनिकेत हाईट्स आर.एच. ९४,शाहुनगर चिंचवड,पुणे येथील रत्नप्रभा ज्वेलर्स या दुकानात |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे रत्नप्रभा ज्वेलर्स या दुकानात येवुन,फिर्यादी यांना पोलीस असल्याचे भासवुन दुकानात येवुन २०,५००/- रू किचे सोन्याचे दागिने खरेदी करून त्यांना रोख पैसे न देता बँकेचा खोटा चेक देवुन फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गायकवाड ९८२२८८६३५२ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २९२/१७,भादविक ३५४(अ),३५४ |
| **फिर्यादी** | एक सज्ञान मुलगी,वय-३१,धंदा-शिक्षण,रा.पुणे (मुळगांव-इराण) |
| **आरोपी** | शिवाजी नारायण बो-हाडे,वय-५३,रा.कृष्णानगर नवी सांगवी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०८/१७ रोजी दु.१२/३० ते १३/३० वा.चे दरम्यान कोथरूड,पुणे येथील एका नामांकीत कॉलेज मधील दुस-या माळयावर रूम क्र.१० मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना पीएचडी साठी प्रवेश मिळवुन देण्याचे बहाण्याने नमुद ठिकाणी बोलावुन घेवुन त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. पी ए पंचभाई ९०९६९६५४०९ |

**दि.०९/०८/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता**

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | हडपसर | भादविक ३२३,३२५,५०६,३४ | मिखायल डेव्हिड गायकवाड | २९ |
| २ | खडक | भादविक ३८० | असिफ समीर शेख | १९ |
| ३ | खडकी | भादविक ३२६,३२४,३२३,५०४,३४,आर्म ४(२५) | रोमन रविंद्र अडसुळ | २५ |
| ४ | खडकी | भादविक ३२६,३२४,३२३,५०४,३४,आर्म ४(२५) | सुहास सुधीर साळवे | २३ |
| ५ | खडकी | भादविक ३२६,३२४,३२३,५०४,३४,आर्म ४(२५) | वजीर शफी शेख | २६ |
| ६ | मार्केटयार्ड | भादविक ३८४,३८५,३८७,३४ | गोविंद पांडुरंग वाल्हेकर | २६ |
| ७ | कोथरूड | भादविक ४५७,३८०,३४ | ओंकार बापु गायके | १९ |
| ८ | कोथरूड | भादविक ४५७,३८०,३४ | समीर सिकंदर राऊत | २० |
| ९ | येरवडा | भादविक १४३,१४९,४४८,५०६ | समीर सुधाकर कापाळे | २८ |
| १० | येरवडा | भादविक १४३,१४९,४४८,५०६ | स्वप्निल बाळासाहेब जगताप | २७ |
| ११ | येरवडा | भादविक १४३,१४९,४४८,५०६ | विशाल विठ्ठल कोंढाळकर | २८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**